महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. :तंशिविकापु/प्रवेश मान्यता/शै.वि.-३/२०२४/ 3139
दिनांक : 1 /०८/२०२४ 01 AUG 2024

**प्रति,**
सर्व प्राचार्य/संचालक,
सर्व अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी (CAP) रिक्त जागांची गणना करुन नोंदणी करण्याबाबत..**

उपरोक्त विषयान्वये सर्व अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संस्थेची थेट व्दितीय वर्ष अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी रिक्त जागांची माहिती **आज दि.०१.०८.२०२४ रोजी साय.०५ :००** वाजेपर्यंत नमूद करण्यात यावी.

सबब संस्थेची थेट व्दितीय वर्ष प्रवेश प्रक्रियेसाठीच्या रिक्त जागा मंजुरीसाठी प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांची यादी (Application ID, Name Branch) विद्यार्थ्यांचा अर्ज, शाळा सोडल्याचा दाखला व Vaccancy Report सिंगल पीडीएफ मध्ये ropune@dtemaharashtra.gov.in या ई-मेल वर पाठविण्यात यावी.

पीडीएफ फाईलला संस्थेचा कोड प्रमाणे नाव दयावे व ई-मेल च्या विषयामध्ये Vaccancy Report of (DTE Code) असे नमुद करावे.

थेट व्दितीय वर्षाच्या रिक्त जागांची माहिती कन्फर्म करताना ती अचुक असेल याची विशेष दक्षता घेण्यात यावी. सदर रिक्त जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चुक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उदभवल्यास होणाऱ्या परिणामास संबंधित संस्थेचे प्राचार्य/संचालक सर्वस्वी जबाबदार राहतील या बाबीची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(मा.रा.जाधव)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता